RNI No. MAHBIL /2009/35527

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार-क

वर्ष १०, अंक ४८] शुक्रवार, जुलै ५, २०२४/आषाढ १४, शके १९४६ [पृष्ठे १०, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक ६५

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाव्यतिरिक्त इतर वैधानिक प्राधिकाऱ्यांनी तयार केलेले (भाग एक, एक-अ व एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले वैधानिक नियम व आदेश यांव्यतिरिक्त इतर) वैधानिक नियम व आदेश; यात भारत सरकार, उच्च न्यायालय, पोलीस आयुक्त, आयुक्त (राज्य उत्पादन शुल्क), जिल्हादंडाधिकारी व निवडणूक आयोग, निवडणूक न्यायाधिकरण, निवडणूक निर्णय अधिकारी व निवडणूक आयोगाखालील इतर प्राधिकारी यांनी तयार केलेले वैधानिक नियम व आदेश यांचा समावेश होतो.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई

अधिसूचना

विद्युत अधिनियम, २००३

क्रमांक मविनिआ/तांत्रिक/विनियम/२०२४/०४०२.—विद्युत अधिनियम, २००३ (२००३ चा ३६) मधील कलम ४३ च्या उप-कलम (१) च्या परंतुकांसह कलम १८१ च्या उप-कलम (२) मधील खंड (टी) आणि कलम ४५ च्या उप-कलम (२) मधील खंड (ए) सह कलम १८१ च्या उप-कलम (२) मधील खंड (यु), कलम ४५ च्या उप-कलम (५), कलम ४६, कलम ४७ च्या उप-कलम (१) आणि उप-कलम (४) सह कलम १८१ च्या उप-कलम (२) मधील खंड (व्ही) आणि खंड (डब्ल्यु) आणि कलम १८१ च्या उप-कलम (२) मधील खंड (एक्स) सह कलम ५० आणि कलम ५७ च्या उप-कलम (१) व उप-कलम (२) सह कलम १८१ च्या उप-कलम (२) मधील खंड (झेडए), कलम ५९, आणि कलम १८१ च्या उप-कलम (२) मधील खंड (झेडपी) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग याद्वारे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता, वितरण परवानाधारकांच्या कृतीची मानके आणि पॉवर क्वालिटी) विनियम, २०२१ मध्ये सुधारणा करण्यासाठी खालीलप्रमाणे विनियम करीत आहे :—

संक्षिप्त शीर्षक आणि प्रारंभ

२.१ या विनियमांना "महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता, वितरण परवानाधारकांच्या कृतीची मानके आणि पॉवर क्वालिटी) (पहिली सुधारणा) विनियम, २०२४" असे म्हणावे.

२.२ हे विनियम **शासकीय राजपत्रातील** त्यांच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून अंमलात येतील.

मुख्य विनियमांच्या विनियम २ मध्ये सुधारणा :—

मुख्य विनियमांच्या विनियम २.२(j) नंतर विनियम २.२(j)(a) ची भर :—

"२.२(j)(a) **"ग्राहकाच्या सरासरी व्यत्ययाच्या वारंवारतेचा निर्देशांक"** (Customer Average Iterruption Frequency Index - CAIFI) म्हणजे आयोगाने विहित केल्याप्रमाणे अहवाल काळात ज्या ग्राहकांनी वीज पुरवठ्यातील व्यत्ययांचा अनुभव घेतला आहे त्यांनी अनुभवलेल्या मोठ्या व्यत्ययांची सरासरी व्यत्यय वारंवारता होय."

मुख्य विनियमांच्या विनियम २.२(ii) नंतर विनियम २.२(ii)(a) ची भर :—

"२.२(ii)(a) **"क्षणिक सरासरी व्यत्ययाच्या वारंवारतेचा निर्देशांक"** (Momentary Average Iterruption Frequency Index - MAIFI) म्हणजे आयोगाने विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे अहवाल काळात प्रती ग्राहक क्षणिक व्यत्ययांची सरासरी संख्या होय.

मुख्य विनियमांच्या विनियम ५.८ च्या दुसरे परंतुक खालीलप्रमाणे बदलण्यात येते :

"परंतु आणखी असे की, वैधानिक तरतुदी आणि परवानग्यांच्या अधीन राहून, वितरण परवानाधारक सर्व दृष्टीने परिपूर्ण अर्ज प्राप्त झाल्यापासून खाली देण्यात आलेल्या कालमर्यादेत नवीन जोडण्या देईल किंवा विद्यमान जोडण्यांमध्ये फेरबदल करेल:

ए. विद्यमान जाळ्यातून कोणत्याही क्षमता वाढीशिवाय जोडणीसाठी

(१) महानगर क्षेत्रातील महापालिका - तीन (३) दिवस

(२) महानगर क्षेत्रातील महापालिका वगळून नागरी क्षेत्र. - सात (७) दिवस

(३) ग्रामीण क्षेत्र - पंधरा (१५) दिवस

बी. वितरणाच्या मुख्य वाहिन्यांमध्ये (मेन्स) क्षमता वाढ किंवा विस्ताराची गरज असलेल्या जोडणीसाठी किंवा वितरण यंत्रणेचा भाग असलेले नवीन उप-केंद्र सुरु करावयाची गरज असल्यास - नव्वद (९०) दिवस."

मुख्य विनियमांच्या विनियम ५.८ नंतर विनियम ५.९ ची भर:

"५.९ अर्जदाराच्या (जो विद्यमान ग्राहक आहे) विनंतीवरुन, वितरण परवानाधारक विद्युत वाहन चार्जिंग यंत्रणेकरिता वीज पुरवठा करण्यासाठी स्वतंत्र जोडणी देईल.

परंतु असे की, ही जोडणी देण्याची कालमर्यादा या विनियमांच्या विनियम ५.८ च्या दुसऱ्या परंतुकामध्ये दिल्यानुसार राहील."

परंतु आणखी असे की, वितरण परवानाधारक एचटी जोडणीच्या बाबतीत इव्ही चार्जिंग स्टेशन/बॅटरी स्वॅपिंग सुविधेसाठी उप-मीटर स्थापित करु शकेल.

मुख्य विनियमांच्या विनियम १५ मध्ये सुधारणा :-

मुख्य विनियमांच्या विनियम १५.३.३ आणि पहिले आणि दुसरे परंतुक खालीलप्रमाणे बदलण्यात येते:-

"१५.३.३ मीटर हरविल्यामुळे ज्या कालावधीसाठी उपलब्ध नसेल त्या कालावधीसाठीचे अंदाजित विद्युत आकार वीज पुरवठा पूर्ववत झाल्यानंतर त्यानंतरच्या देयकामध्ये ग्राहकावर आकारण्यात येतील. ग्राहकाने तक्रार केल्यावर किंवा प्राधिकृत प्रतिनिधीने पाहणी केल्यावर मीटर जळाल्याचे किंवा सदोष असल्याचे आढळून आले तर तो बदलण्यात येईल आणि पुरवठा पूर्ववत करण्यात येईल.

परंतु असे की, मीटर जळण्याचे किंवा सदोष असल्याचे कारण ग्राहकाशी संबंधित असल्यास वितरण परवानाधारक नवीन मीटरची किंमत ग्राहकाकडून वसूल करील.

परंतु आणखी असे की, मीटर जळाल्यामुळे किंवा सदोष असल्यामुळे उपलब्ध नसलेल्या कालावधीसाठीचे अंदाजित विद्युत आकार पुरवठा पूर्ववत झाल्यानंतरच्या त्यापुढील देयकामध्ये ग्राहकावर आकारण्यात येतील."

मुख्य विनियमांच्या विनियम १५.३.४ खालीलप्रमाणे बदलण्यात येते :

"१५.३.४ जळालेल्या किंवा सदोष मीटर किंवा हरवलेल्या मीटरचा अपवाद वगळता, वितरण परवानाधारकाला ग्राहकाकडून मीटरची किंमत वसूल करण्याचा अधिकार असणार नाही."

मुख्य विनियमांच्या विनियम १५.४.३ नंतर १५.४.४ ची खालीलप्रमाणे भर:

"१५.४.४ पूर्व-भरणा केलेल्या मीटर्समधील नोंदी वितरण परवानाधारकाकडून प्रत्येक महिन्यातून एकदा दूरस्थपणे घेण्यात येतील आणि वीज वापराच्या संबंधातील माहिती ग्राहकाला संकेतस्थळ किंवा मोबाईल ॲप्लिकेशन किंवा लघु संदेश सेवा आणि तत्सम साधनांद्वारे उपलब्ध करुन देण्यात येईल.

परंतु असे की, पूर्व-भरणा (प्री-पेमेंट) केलेले स्मार्ट मीटर्स असलेल्या ग्राहकांना देखील किमान दैनंदिन तत्त्वावर त्यांचा वीज वापर आणि शिल्लक रक्कम तपासण्यासाठी माहिती सुगम्य (डेटा ॲक्सेस) करुन देण्यात येईल."

मुख्य विनियमांच्या विनियम १५.६.१ नंतर १५.६.१ (ए) ची खालीलप्रमाणे भर:

"१५.६.१ (ए) मीटरमधील नोंदी वीज वापराशी सुसंगत नसणे, मीटर बंद पडणे, सील खराब होणे, मीटर जळणे किंवा खराब होणे, आणि तत्सम बाबीं संबंधात ग्राहकाची तक्रार प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांच्या आत वितरण परवानाधारकाकडून मीटर्सची तपासणी करण्यात येईल.

परंतु असे की, मीटरमधील नोंदी त्याच्या वीज वापराशी सुसंगत नसल्याच्या ग्राहकाच्या तक्रारी प्रकरणी, वितरण परवानाधारक तक्रार प्राप्त झाल्यापासून पाच दिवसांच्या आत वीज वापराची पडताळणी करण्यासाठी किमान तीन महिन्यांच्या कालावधीकरिता अतिरिक्त मीटर बसवील. परंतु आणखी असे की, अतिरिक्त मीटर बसविण्यासाठी जागेची मर्यादा असल्यास, ग्राहक आणि वितरण परवानाधारक परस्पर सहमतीने तीन महिन्यांच्या कालावधीसाठी स्वीकारार्ह ठिकाणी अतिरिक्त मीटर बसवील. "

मुख्य विनियमांच्या विनियम १५.६.२ मध्ये अतिरिक्त परंतुकाची खालीलप्रमाणे भर:

"परंतु असेही की, मीटर्सच्या तपासणीसाठी एनएबीएलने अधिस्वीकृती दिलेल्या प्रयोगशाळांची यादी वितरण परवानाधारकाच्या वेगवेगळ्या कार्यालयांमध्ये तसेच त्याच्या संकेत-स्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल."

मुख्य विनियमांच्या विनियम २२ मध्ये सुधारणा:

मुख्य विनियमांच्या विनियम २२.१ नंतर २२.१ (ए) ची खालीलप्रमाणे भर :

"२२.१ (ए) वितरण परवानाधारक सर्व ग्राहकांना २४ x ७ वीज पुरवठा करेल:

परंतु असे की, आयोग ग्राहकांच्या काही वर्गवारींकरिता वीज पुरवठ्याचे कमी तास निश्चित करु शकेल."

मुख्य विनियमांच्या विनियम २२.१२.१ मधील डी आणि इ ची खालीलप्रमाणे भर :

"डी. खालील सुत्रांनुसार परिगणना केलेला 'ग्राहकाच्या सरासरी व्यत्ययाच्या वारंवारतेचा निर्देशांक' (CAIFI);

$CAIFI = \Sigma Ni / C_N$

जेथे,

Ni: ग्राहक व्यत्ययांची एकूण संख्या

C_N: व्यत्यय अनुभवलेल्या ग्राहकांची एकूण संख्या

इ. खालील सुत्रांनुसार परिगणना केलेला, 'क्षणिक सरासरी व्यत्ययाच्या वारंवारतेचा निर्देशांक' (MAIFI);"

$MAIFI = \Sigma Mi * Ci / Ct$

जेथे,

Mi: क्षणिक व्यत्त्ययांची संख्या (५ मिनिटांपेक्षा जास्त / < 5min)

Ci: व्यत्त्यय आलेल्या फिडर्समधील ग्राहकांची संख्या

Ct: मंडल/क्षेत्रातील फिडर्समधील ग्राहकांची एकूण संख्या (U/R)

मुख्य विनियमांच्या विनियम २८ मध्ये सुधारणा:

मुख्य विनियमांच्या विनियम २८.८ नंतर २८.९ ची खालीलप्रमाणे भर :

"२८.९ वितरण परवानाधारक आऊटेजचे संनियंत्रण करण्यासाठी आणि पुरवठा पूर्ववत करण्यासाठी शक्य तितक्या लवकर प्राधान्याने स्वयंचलित साधनांसह एक यंत्रणा उभारेल."

मुख्य विनियमांच्या परिशिष्ट - २ मध्ये सुधारणा:

मुख्य विनियमांच्या परिशिष्ट २ चा अनु. क्र. १ (दोन) खालीलप्रमाणे बदलण्यात येतो :

पुरवठ्याचे कार्य/घटना		मानक	देय भरपाई	Automatic/Manual
१.	**विद्युत पुरवठा (तात्पुरत्या जोडणीसह) सुरु करणे**			
(दोन)	परिपूर्ण अर्ज प्राप्त झाल्याच्या तारखेपासून आणि आकारांचा भरणा केल्यानंतर, पुरवठा करावयाचा कालावधी		रू.५०/- विलंबाच्या प्रति आठवड्यास किंवा त्याच्या भागास, ग्राहक वर्गवारीसाठी लागू असलेल्या सेवा जोडणी आकारांच्या जास्तीत जास्त दुपटीच्या अधीन राहून	
	- अस्तित्वात असलेल्या विद्युत जाळ्यातून कोणत्याही क्षमता वाढीशिवाय जोडणी द्यावयाची असल्यास	(१) महानगर क्षेत्रातील महापालिका क्षेत्रात - तीन (३) दिवस (२) महानगर क्षेत्रातील महापालिका वगळून नागरी क्षेत्रात - सात (७) दिवस (३) ग्रामीण क्षेत्रात - पंधरा (१५) दिवस		Automatic
	-वितरण मेन्सचा विस्तार किंवा वाढ करावयाची असल्यास	नव्वद (९०) दिवस		Automatic
	- वितरण यंत्रणेचा भाग असलेले नवीन उप-केंद्र सुरु करावयाची गरज असल्यास	नव्वद (९०) दिवस		Automatic

डॉ. राजेंद्र गं. आंबेकर,

मुंबई,

सचिव,

दिनांक ५ जुलै, २०२४.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग.

MAHARASHTRA ELECTRICITY REGULATORY COMMISSION

NOTIFICATION

ELECTRICITY ACT, 2003.

No. MERC/Tech/Regulation/2024/0402.—In exercise of the powers conferred by the proviso to sub- section (1) of Section 43 read with clause (t) of sub-section (*2*) of Section 181 and clause (a) of sub- section (2) of Section 45 read with clause (u) of sub-section (*2*) of Section 181, sub-section (*5*) of Section 45, Section 46, sub-section (*1*) and sub-section (*4*) of Section 47 read with clause (v) and clause (w) of sub-section (*2*) of Section 181 and Section 50 read with clause (x) of sub-section (*2*) of Section 181 and sub-section (*1*) and sub-section (*2*) of Section 57 read with clause (za) of sub-section (*2*) of Section 181, Section 59 and clause (zp) of sub-section (*2*) of Section 181 of the Electricity Act, 2003, the Maharashtra Electricity Regulatory Commission hereby makes the following Regulations, to amend the Maharashtra Electricity Regulatory Commission (Electricity Supply Code and Standards of Performance of Distribution Licensees including Power Quality) Regulations, 2021 (**'the Principal Regulations'**), namely:

Short title and commencement

2.1. These Regulations may be called the Maharashtra Electricity Regulatory Commission (Electricity Supply Code and Standards of Performance of Distribution Licensees including Power Quality) (First Amendment) Regulations, 2024.

2.2. These Regulations shall come into force from the date of their publication in the Official Gazette.

Amendment to Regulation 2 of the Principal Regulations: -

Introduction of Regulation 2.2(j)(a) after Regulation 2.2(j) of the Principal Regulations:—

"2.2(j)(a) **"Customer Average Interruption Frequency Index (CAIFI)"** means the average interruption frequency of the sustained interruptions for those who experienced interruptions during the reporting period, as specified by the Commission."

Introduction of Regulation 2.2(ii)(a) after Regulation 2.2(ii) of the Principal Regulations:—

"2.2(ii)(a) **"Momentary Average Interruption Frequency Index (MAIFI)"** means the average number of momentary interruptions per Consumer occurring during the reporting period, as specified by the Commission."

Substitution of 2nd Proviso of Regulation 5.8 of the Principal Regulations:

Provided further that subject to the statutory provisions and permissions, the Distribution Licensee shall release new connections or modify an existing connection, after submission of application complete in all respects within the following timelines:

a. Connection from existing network without any augmentation:
    1. Metropolitan Area – Three (3) Days
    2. Other Municipal Areas – Seven (7) Days
    3. Rural Area – Fifteen (15) Days

b. Connection requiring augmentation or extension of Distribution Mains or commissioning of new sub-stations forming a part of the distribution system – Ninety (90) Days.

Introduction of Regulation 5.9 after Regulation 5.8 of the Principal Regulations:

"5.9 On the request from an applicant (who is existing consumer), the Distribution Licensee shall provide a separate connection for supply of electricity for Electric Vehicle charging system:

Provided that the timeline for providing this connection shall be in accordance with the 2nd Proviso of Regulation 5.8 of these Regulations:

Provided further that the distribution licensee may install sub-meter for EV charging station/ battery swapping facility in case of HT connection."

Amendment to Regulation 15 of the Principal Regulations:

Substitution of Regulation 15.3.3 and 1st and 2nd Proviso of the Principal Regulations:

"15.3.3 The estimated electricity charges for the period for which meter was not available due to loss of meter may be billed to the Consumer in the ensuing bill after supply is restored. Where, upon a complaint by the Consumer or inspection by the Authorised Representative, the meter is found to be burnt or defective, it shall be replaced and supply restored to the Consumer:

Provided that the Distribution Licensee may recover the price of the new meter from the Consumer wherever the cause of burnt or defective meter is attributable to Consumer:

Provided further that the estimated electricity charges for the period for which meter was not available due to burning of meter or being defective may be billed to the Consumer in the ensuing bill after supply is restored."

Substitution of Regulation 15.3.4 of the Principal Regulations:

"15.3.4 Except in the case of a burnt meter or defective meter or a lost meter, the Distribution Licensee shall not be authorized to recover the price of the meter from the Consumer."

Introduction of Regulation 15.4.4 after Regulation 15.4.3 of the Principal Regulations:

"15.4.4 The pre-payment meters shall be read remotely by the Distribution Licensee once every month and the data regarding energy consumption shall be made available to the Consumer, through website or mobile application or Short Message Service and the like:

Provided that the Consumers having smart pre-payment meters shall also be given the data access for checking their consumption and balance amount at least on daily basis."

Introduction of Regulation 15.6.1 (A) after Regulation 15.6.1 of the Principal Regulations:

"15.6.1 (A) The testing of meters shall be done by the Distribution Licensee within thirty days of receipt of the complaint from the consumer about the meter readings not being commensurate with his consumption of electricity, stoppage of meter, damage to the seal, burning or damage of the meter, and the like:

Provided that in case of complaint by a consumer regarding meter reading not being commensurate with his consumption of electricity, Distribution Licensee shall install an additional meter within five days from the date of receipt of the complaint, to verify the consumption, for a minimum period of three months:

Provided further that in case of space constraints for installation of additional meter, the consumer and Distribution Licensee shall mutually agree on an acceptable location for installation of additional meter for the period of three months"

Introduction of additional Proviso in Regulation 15.6.2 of the Principal Regulations:

Provided also that the list of NABL accredited laboratories for testing of meters shall be made available in their various offices as well as on the website of the Distribution Licensee.

Amendment to Regulation 22 of the Principal Regulations:-

Introduction of Regulation 22.1 (A) after Regulation 22.1 of the Principal Regulations:

"22.1 (A) The Distribution Licensee shall supply 24x7 power to all Consumers:

Provided that the Commission may specify lower hours of supply for some categories of consumers like agriculture."

Introduction of d. and e. in Regulation 22.12.1 of the Principal Regulations:

d. Customer Average Interruption Frequency Index (CAIFI), calculated in accordance with the following formula:

$$CAIFI = \Sigma Ni/ C_N$$

Where,

Ni: Total number of customer interruptions

C_N: *Total number of customers interrupted*

e. Momentary Average Interruption Frequency Index (MAIFI), calculated in accordance with the following formula:

$$\text{MAIFI} = \Sigma \text{Mi*Ci/Ct}$$

where,

Mi: Number of momentary Interruptions (< 5min)

Ci: Number of consumers on the interrupted feeders

Ct: Total Number of consumers (U/R) in the feeders in the circle/area

Amendment to Regulation 28 of the Principal Regulations:-

Introduction of Regulation 28.9 after Regulation 28.8 of the Principal Regulations:

"28.9 The Distribution Licensee shall put in place a mechanism, preferably with automated tools to the extent possible, for monitoring and restoring outages."

Amendment to Annexure-II of the Principal Regulations: -

Substitution of Sr. No. 1 (ii) in Annexure-II of the Principal Regulations.

Supply Activity/Event		Standard	Compensation Payable	Automatic/Manual
1. Provision of Supply (Including Temporary connection)				
(ii)	Time period for provision of supply from the date of receipt of completed application and payment of charges:		Rs 50 per week or part thereof of delay subject to maximum of twice the service connection charges applicable for the Consumer category	
	-in case connection is to be from existing network without any augmentation	1. Metropolitan Area – Three (3) Days 2. Other Municipal Areas – Seven (7) Days 3. Rural Area – Fifteen (15) Days		Automatic
	-where extension or augmentation of distributing main is required	Ninety (90) Days		Automatic
	- where commissioning of new sub-station forming a part of the distribution system is required	Ninety (90) Days		Automatic

DR. RAJENDRA G. AMBEKAR,
Secretary,
Maharashtra Electricity Regulatory Commission.

Mumbai,
dated 5th July, 2024.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.